# University of Mumbai

एएक्युए/आयसीडी/२०२४ -२५/१५६

**परिपत्रक :-**

**विषय : स्थायी/अस्थायी शिक्षकांचे उपस्थिती अहवाल वेळेवर सादर करणेबाबत ...**

विद्यापीठाचे विविध विभाग / केंद्र / संस्था यांचे संचालक / विभागप्रमुख / समन्वयक, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी संचालक, ठाणे / कल्याण / रत्नागिरी उपपरिसर, व प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांचे या कार्यालयाचे क्र. एएक्युए/आयसीडी/२०२३ -२४/१६९८ दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या परिपत्रकाकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व संबंधित संचालक/विभाग प्रमुख/ समन्वयक/प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधीनस्त असलेल्या सर्व स्थायी/अस्थायी शिक्षकांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ या विभागास प्रत्येक महिन्याच्या ५ (पाच) तारखेपर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. ज्या शिक्षकांचा उपस्थिती अहवाल वेतन कक्ष, वित्त व लेखा विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ या विभागास प्रत्येक महिन्याच्या ५ (पाच) सादर करण्यात येणार नाही त्यांचे वेतन रोखले अथवा वेळेवर न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागप्रमुख/संचालक/समन्वयक व संबंधित शिक्षकांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सदर परिपत्रक सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक – ३० एप्रिल, २०२४

प्रति,

मुंबई विद्यापीठाचे विविध विभाग / केंद्र / संस्था यांचे संचालक / विभागप्रमुख / समन्वयक, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी संचालक, ठाणे / कल्याण / रत्नागिरी उपपरिसर, संचालक विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, अंबाडवे व प्रभारी संचलक, ज्ञानस्त्रोत केंद्र

प्रत महितीकरीता रवाना :-

१. मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक
२. मा. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहायक
३. मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक